# कलेचे आश्रयदाते राजर्षी छत्रपती शाहू महाराज

**डॉ.कविता अशोक गगराणी** सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,न्यु कॉलेज, कोल्हापूर

---

**प्रस्तावना -**

If we are to preserve culture we must continue to create it.[1]जर आपल्याला संस्कृती जतन करावयाचे असेल तर ती आपल्याला निर्माण करावी लागेल. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीचे मूळ संस्कृतीत दडलेले असते आणि समाजाचा दर्जा देखीलठरत असतो. प्राचीन कालखंडापासून तात्कालीन राज्यकर्त्यांनी विविध कलांना प्रोत्साहन व राजाश्रय देऊन राज्याचा सांस्कृतिक विकास घडवून आणल्याची उदाहरणे इतिहासात सापडतात. विविध अभिजात कला, लोककला आणि स्थापत्यकला यांना मिळालेला राजाश्रय हे समाजाच्या सांस्कृतिक विकासाचे प्रतीक मानले जाते. दक्षिणी संस्थानातील कोल्हापूर संस्थानचे राज्यकर्ते छत्रपती राजर्षी शाहू महाराज (1894-1922) यांनी संस्थानाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक प्रगती बरोबरच सांस्कृतिक विकासातही अत्यंत भरीव योगदान दिले. दूरदृष्टीच्या छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूरच्या सर्वांगीण प्रगतीत सांस्कृतिक परंपरा व सांस्कृतिक क्षेत्राचे महत्व ओळखून विविध कला व कलाकारांना, मल्ल विद्येला व मल्लांना सर्वतोपरी सहाय्य करून प्रोत्साहन दिले. त्यांनी दिलेल्या उदार राजाश्रयामुळे कोल्हापुरात विविध कला भरभराटीस आल्या. कोल्हापूरची 'कलापूर' अशी ओळख छत्रपतीशाहू महाराजांच्या उदार राजाश्रयाच्या धोरणामुळेच निर्माण झाली. छत्रपती शाहू महाराजांनी विविध कला व क्रीडा प्रकारांना दिलेल्या सक्रिय प्रोत्साहनाचा थोडक्यात आढावा घेणे औचित्यपूर्ण ठरेल.

**संगीत व गायन –**

Music is life itself.[2]संगीत म्हणजे जीवन आहे. संगीत हे जादूचे सर्वोत्तम रूप आहे. कलेची उत्तम जाण असणारे आणि कलाकारांचे महत्त्व जाणणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राजदरबारात नामांकित गायक व संगीत तज्ञ यांना राजश्रय देऊन कोल्हापूरची संगीत परंपरा विकसित केली. त्यांनी भारतातील सुप्रसिद्ध संगीत तज्ञ व गायक असणाऱ्या जयपूरच्या उनियारा घराण्याच्या गुलाम अहमद खान उर्फ अल्लादियाखां (1855-1946) व त्यांचे बंधू हैदर खान (1861-1936) यांना सन्मान पूर्वक दरबारी गायक म्हणून आमंत्रित केले. स्वर्गीय आवाजाची देणगी लाभलेल्या अल्लादियाखां यांनी देखील कलेची कदर करणाऱ्या राजाच्या आमंत्रणाचा आनंदाने स्वीकार करून ते दरबारी गायक म्हणून रुजू झाले.[3] अल्लादियाखा आठवड्यातून दोन दिवस व नवरात्र प्रसंगी दररोज देवी पुढे गात असत. त्यांनी संगीतातील अनेक नवी रागांची निर्मिती केली शेकडो चिजा त्यांना तोंडपाठ होत्या. त्यांचे पुत्र मंजीखां व भुर्जीखां यांनी देखील कोल्हापूरच्या गानपरंपरेत मोलाची भर घातली. अल्लादियाखां यांनी मोठी शिष्य परंपरा निर्माण करून कोल्हापूरची संगीत परंपरा अबाधित राखली. त्यांनी हैदर खान, भूर्जीखां, मंजीखां, भास्करबुवा बखले, मोगुबाई कुरडईकर, महाराष्ट्र कोकीळ शंकरराव सरनाईक, गोविंद बुवा शाळीग्राम अशी दिग्गज शिष्य परंपरा निर्माण केली. अल्लादिया खान यांनी अभिजात संगीताची एक वैशिष्ट्यपूर्ण व आगळीच परंपरा निर्माण केली. सुर- ताल-लय व शब्दफेक यातून ते चीजेला अविस्मरणीय करत.[4] गुणांची व विद्येची कदर असणाऱ्या छत्रपती शाहू महाराजांनी अलादियांखां दरबारी गायक म्हणून सन्मानाने आणले. अल्लादिया खा आणि त्यांच्या शिष्यांनी हिंदुस्थानात कोल्हापूरचे नाव अजरामर केले. कोल्हापूरात 1893 साली बाबा उर्फ केशवराव देवल यांनी देवल क्लब ची स्थापना केली. या क्लबच्या गाण्याच्या मैफिली कोल्हापुरातील लक्ष्मीप्रसाद थिएटरच्या मागील लुकतुके यांच्या माडीवर होत असत. दिवसेंदिवस त्यांना जागा अपुरी पडू लागली. त्यावेळी निधी जमवणे व इतर कार्यक्रमांची आखणी सुरू झाली. कलेचे उदार आश्रयदाते असणाऱ्या शाहू महाराजांनी खासबाग शेजारी असणारी जागा देवल क्लबच्या उभारणी करिता दिली.[5] त्यांच्या उदार राजाश्रयामुळे 1919 साली क्लब ची इमारत उभी राहिली. आज सांस्कृतिक क्षेत्रात दिमाखात उभा असणाऱ्या देवल क्लब च्या वटवृक्षाचे राजर्षींनी केलेले बिजारोपण हे त्यांच्या दूरदृष्टीचे द्योतक होय.

**नाटक -**

The theatre was created to tell people the truth about life and the social situation.[6]जागतिक आणि भारतीय रंगभूमीला समृद्ध असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. कलेची व गुणांची उत्तम पारख असणाऱ्या छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात नाट्यसृष्टीच्या उत्कर्षाकरिता महत्वपूर्ण योगदान दिले. अनेक नाट्य संस्था व कलाकारांना त्यांच्या प्रारंभीच्या काळात व पुढेही हर तऱ्हेने प्रोत्साहन दिले. यामध्ये नट श्रेष्ठ बालगंधर्व, संगीतसूर्य केशवराव भोसले, नटसम्राट गणपतराव जोशी, गोविंदराव टेंबे, दत्तोपंत हल्याळकर, विष्णुपंत पागनीस यासारख्या नाट्य क्षेत्रातील

दिग्गज कलावंतांचा समावेश होतो. छत्रपती शाहू महाराजांच्या व्यक्तीचे कलागुणपारखण्याच्या दृष्टीचे उत्तम उदाहरण म्हणजे बालगंधर्व होय. नारायण राजहंस उर्फ बालगंधर्व हे लहानपणी औषध उपचाराकरिता कोल्हापूरला आलेले होते. येथील वास्तव्यात गाणे शिकत असताना त्यांचे गायन शाहू महाराजांसमोर आले त्यावेळी त्या मुलाची लकब पाहून उजव्या कानाने कमी ऐकू येते हे महाराजांना जाणवले. त्यांनी ताबडतोब मिरज येथील निष्णात डॉक्टर व्हेल यांच्याद्वारे बालगंधर्वांवर उपचार करविले. पुढे शाहू महाराजांच्या सांगण्यावरूनच बालगंधर्वांना किर्लोस्कर नाटक मंडळीत घेण्यात आले.[7] पुढे 1913 ला त्यांनी 'गंधर्व नाटक कंपनीची' स्थापना केली. छत्रपती शाहू महाराजांच्या ठायी असलेली कलागुणांची योग्य पारख करण्याच्या दृष्टीमुळे मराठी रंगभूमीला बालगंधर्वांसारखा असामान्य कलाकार मिळाला. कलाकारांच्या गुणांचे अवलोकन करून त्यांचा समर्पक नाट्यसंस्थेमध्ये समावेश करून देण्याचा शाहू महाराजांचा नेहमी प्रयत्न असे. अशा अनेक उदाहरणांपैकी एक उदाहरण म्हणजे विष्णुपंत पागनीस यांचे होय. त्यांचे गुण हेरून त्यांचा स्वदेश हितचिंतक नाटक मंडळीत समावेश करण्याचे श्रेय शाहू महाराजांना जाते.[8]1907 साली शाहू महाराजांनी करून घेतलेल्या 'शारदा नाटकाच्या' प्रयोगात पागनीसानी शारदेची भूमिका उत्तम वाटली होती. पुढे त्यांच्या रंगभूमीवरीलअनेक भूमिकांबरोबरच 'संत तुकाराम' चित्रपटातील तुकारामची भूमिका अजरामर झाली. सुप्रसिद्ध गायक नट दत्तोपंत हल्याळकर यांनी कोल्हापुरात प्रथम 'करवीर निवासिनी' व नंतर 'महालक्ष्मी प्रसादिक' कंपनीची स्थापना केली. 1908 ला श्रीमंत अक्कासाहेब महाराज यांच्या विवाहप्रसंगी राजवाड्यावर हल्याळकरांनी 'मृच्छकटिक' नाटकाचा अत्यंत प्रभावशाली प्रयोग केला. ते पाहून राजघराण्यातीलस्त्रिया ओक्साबोक्सी रडू लागल्या. व त्यांनी खेळ बंद करण्याची विनंती केली. छत्रपती शाहू महाराजांची हल्याळकरांवर खूप मर्जी होती, त्यांना फेटे, शालू देऊन गौरवत असत. नटसम्राट गणपतरावजोशीयांनी महाराजांवर त्यांच्या असलेल्या निष्ठेमुळे आपल्या नाटक कंपनीला 'शाहूनगरवासी' असे नाव दिले होते.[9] वयाच्या चौथ्या वर्षी स्वदेश 'हितचिंतक नाटक मंडळीत' दाखल झालेल्या संगीतसूर्य केशवराव भोसले यांनी वयाच्या 18 व्या वर्षी 'ललितकलादर्श' ही नाटक कंपनी स्थापन केली. राज दरबारा करून त्यांना खूप मानसन्मान मिळाले. त्यांच्या 'संयुक्त मानापमान' या नाटकाला प्रचंड लोकप्रियता मिळाली.[10] केशवराव भोसले व बालगंधर्व यांचा एक संयुक्त जलसा कोल्हापूरच्या करवीर नगर वाचन मंदिर मध्ये झाल्याचा उल्लेख सापडतो. कोल्हापूर संस्थानातील उदार राजाश्रयामुळे येथील अनेक कलांबरोबर नाट्य चळवळही फोफावत होती. अनेक संस्था येथे नाट्य प्रयोग करण्यासाठी येत असत येथे अनेक संस्था स्थापन ही होत होत्या. येथे स्थापन झालेल्या कोल्हापूरकर संगीत मंडळी या नाटक कंपनीला सर्वसामानाचा पुरवठा शाहू महाराजांनी केला होता. 'शृंगार मंजिरी' चा प्रयोग हा या कंपनीचा हातखंडा होता.[11] कोल्हापुरात आलेल्या अनेक नाटक मंडळ्यांना किराणा मालाचे दुकानच शाहू महाराज देत असत.राजर्षी शाहू छत्रपतींच्या राजाश्रयाखाली कोल्हापुरात 1915 ला 'शिवराज नाटक कंपनीची' स्थापना झाली. गायक, वादक, नट गोविंदराव टेंबे हे या कंपनीचे सूत्रधार होते.[12] याच वर्षी म्हणजे 1915 ला दसऱ्याच्या मुहूर्तावर नाट्य क्षेत्राच्या इतिहासात चिरस्मरणीयठरेल अशा राजर्षी शाहू महाराजांनी बांधलेल्या 'पॅलेस थिएटर' या नाट्यगृहाचे उद्घाटन झाले. याप्रसंगी 'किर्लोस्कर नाटक' मंडळींने मानापमान नाटकाचा प्रयोग सादर केला. पॅलेस थिएटरचे पुढे नाव बदलून संगीतसूर्य केशवराव भोसलेच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी 'केशवराव भोसले नाट्यगृह' असे नामाभिधान करण्यात आले.[13]

**पोवाडा (शाहिरी)** –

शिवकालापासून शाहिरी कलेला राजाश्रय लाभलेला आहे. पेशवेकालात हा कलाप्रकार अधिकच लोकप्रिय झाला. तात्कालीन राजकीय प्रसंग किंवा घटनेवर आधारित असणाऱ्या पोवाड्याची भाषा सरळसोट असते. त्यातील प्रत्येक परिच्छेदास चौक असे म्हणतात. वीररसपूर्ण व स्फूर्तीदायक या लोककला प्रकारास सादर करणारा कलाकार शाहीर हा पोवाडा सादर करताना डफ हे वाद्य वाजवतो.[14] या कलेला राजाश्रयाची परंपरा छत्रपती शाहू महाराजांनी जोपासली. त्यांनी शाहिरांना सरकार दरबारी नोकऱ्या व तालमीसाठी मोफत जागा दिल्या. कोल्हापूर हे भेदिक गाण्यासाठी प्रसिद्ध आहे. यात कलगी व तुरा असे दोन पक्ष असतात. भेदिक गाणे म्हणजे अध्यात्माच्या दोन विचारसरणीच्या अनुयायांचे सवाल-जबाब होय. राजर्षींच्या कालखंडात दोन्ही पक्षांच्या लोकांकडून वेदांत विषयावर केलेली कवने गायली गेली. छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत आपल्या शीघ्र कवित्वामुळे प्रसिद्धीस आलेले शाहीर म्हणजे लहरी हैदर हे होय. शाहिरी परंपरेत अग्रगण्य असणाऱ्यालहरी हैदर यांना आधुनिक मराठी शाहिरीचे अग्रदूत मानले जाते. कलगीतुऱ्याच्या भेदिक गाण्याच्या स्पर्धा लावून त्यांना जरतारी फेटे रोख बक्षिसे, मानाचे किताब देऊन शाहू महाराज त्यांचा गौरव करीत असत. शाहीर लहरी हैदर यांच्या शिष्यांमध्ये व पिराजीराव सरनाईक ही दोन महत्त्वाची नावे येतात. श्री कुंभार यांना त्यांच्या सत्यशोधक समाज व त्याचे कार्य या पोवाड्याबद्दल शाहीर तिलक हा किताब देऊन गौरवण्यात आले.कोल्हापूरच्या सत्यशोधक समाजाने

भरविलेल्या शाहिरी स्पर्धेत पिराजीराव सरनाईक यांना त्यांच्या सत्यशोधक समाजाच्या पोवाड्याबद्दल शाहीर तिलक किताबाने देऊन गौरवण्यात आले. कोल्हापूरच्या छत्रपती घराण्यावर त्यांनी अनेक पोवाडे लिहिले. लहरी हैदर यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रोत्साहनाने अनेक सामाजिक व ऐतिहासिक विषयावरील पोवाडे लिहिले. झाशीची राणी तालाजी मालुसरे, छत्रपती शाहू, जोधपूर ची राणी, हिंदुस्थानचे दारिद्र्य, आधुनिक फाजील सुधारणेचा पोवाडा इत्यादी त्यांचे प्रसिद्ध पोवाडे आहेत.[16]

**तमाशा –**

'तमाशा' हा फारसी शब्द असून प्रदर्शन किंवा सामान्य खेडे गावचे नाटक असा याचा अर्थ होतो. पुढे उर्दू व नंतर मराठीत हा शब्द प्रचलित झाला. तमाशा हा लोककलेचा प्रकार गण, गवळण व वग या तीन टप्प्यात सादर केला जातो.[17] राजर्षी शाहू महाराजांनी या लोककला प्रकाराला उदार राजाश्रय दिला. भाऊ फक्कड या तमाशा कलावंताला त्यांनी प्रोत्साहन दिले. या कलेला राजाश्रय देण्याचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे सत्यशोधक समाजाला पाठिंबा देऊन जातीपातीच्या भिंती मोडाव्या,सोवळे ओवळे, कर्मकांड हे सर्व थोतांड आहे असा संदेश देणारे 'वांग्याचे भूत' सारखे अनेक वग सत्यशोधकी तमासगीरांनी रचले व गाजविले. रेठरे बुद्रुक गावचे नामवंत वगलेखक पठ्ठे बाबुराव यांना खास बोलावून 'मिठाराणीचा वग' चा प्रयोग शाहू महाराजांनी आपल्यासमोर करविला. पुढे कोल्हापुरात मिठाराणीचे अनेक प्रयोग झाले.[18] या काळात गोंधळ, भारुड, दशावतार, भजन, कीर्तन यासारखे कला प्रकारही कोल्हापुरात अत्यंत लोकप्रिय होते. चित्रकलेला छत्रपती शाहू महाराजांनी प्रोत्साहन दिले होते. आबालाल रेहमान यांच्या सारख्या मनस्वी चित्रकाराला त्यांनी राजाश्रय दिला होता. आनंदराव पेंटरांचे त्यांनी 'अरे हा पेंटर का जादूगार?'या शब्दात कौतुक केलें होते. अशारीतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रोत्साहन व राजाश्रयाने अनके कला कोल्हापुरात भरभराटीस आल्या होत्या.

**निष्कर्ष-**

या सर्व पार्श्वभूमीवर 19 व्या शतकाच्या शेवटी जगात आणि 20 व्या शतकाच्या सुरुवातीस भारतात एका अत्यंत अपरिचित आणि क्रांतिकारक अशा मनोरंजनाच्या माध्यमाचा शोध लागला. ते माध्यम म्हणजे 'चित्रपट'हेहोय. 'कलापूर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोल्हापूर ने या क्षेत्रात आपला स्वतंत्र ठसा उमटवला नसता तरच नवल! कोल्हापुरात छत्रपती शाहू महाराजांच्या राजाश्रयामुळे जोपासली गेलेली कलापरंपरा आणि निर्माण झालेली प्रयोगशीलता यामुळे कला आणि तंत्र यात आघाडीवर असणाऱ्या कोल्हापूरने चित्रपट क्षेत्रात अनेक मापदंड निर्माण केलें. विविध कलांना राजाश्रय देण्याचे छत्रपती शाहू महाराजांचे धोरण आणि वारसा छत्रपती राजाराम महाराजांनी देखील पुढे सुरू ठेवला. कोल्हापुरात कलानिर्मितीस असणारे पोषक वातावरणआणि प्रोत्साहन चित्रपट माध्यमाच्या उदय व विकासास उपयुक्त ठरले. चित्रकार, शिल्पकार, तंत्रज्ञ असणाऱ्या कलामहर्षी बाबुराव पेंटर यांनी कोल्हापुरात 'महाराष्ट्र फिल्म कंपनीची' स्थापना करून 1920 ला स्वतः बनविलेल्या छायाचित्रकाने चित्रित केलेला 'सैरन्ध्री' हा पहिला मूकपट सादर केला. लोकमान्य् टिळकानी 'सिनेमा केसरी' हा किताब देऊन बाबुराव पेंटरांना गौरविले.[19] छत्रपती शाहू महाराजांनी करवीरनगरीच्या या सुपुत्राचा चित्रपट निर्मितीतीत त्यांच्या यशाबद्दल यथोचित सत्कार करून गौरविले. पुढे कोल्हापूर हे चित्रपट निर्मितीचे माहेरघर बनले. कोल्हापूरच्या राजदरबाराने कलेला प्रोत्साहन देण्याचे छत्रपती शाहू महाराजांची परंपरा व धोरण पुढेही जोपासले असे दिसून येते.

**संदर्भ–**

1. Johan Huizinga, Internet.
2. Louis Armstrong. Internet.
3.ग. रं. भिडे, पु.ल. देशपांडे (संपा.), कोल्हापूर दर्शन, पृष्ठ क्र १६७.
4.कित्ता, पृ. १६८.
5.मुलाखत – श्री श्रीकांत दिग्रजकर.
6.Internet Steela Adler, Brinyquote.com.
7.देसाई व. शां. बालगंधर्व : व्यक्तीव कला, पृ.क्र १४.
8.दैनिक पुढारी, दिवाळी अंक १९६७, पृ. क्र. ४४.
9.ग. रं. भिडे, पु.ल. देशपांडे, उपरोक्त, पृ. क्र १८४.
10. कित्ता पृ. क्र ४५१.
11. कित्ता पृ. क्र १८८.
12. टेंबे गोविंदराव, माझा जीवन विहार पृ क्र १८४.
13. ग र भिडे, पु.ल. देशपाडे, उपरोक्त पृ. क्र. १८३.
14. गाढवे ए.एस, एंटरटेनमेंट अँड एज्युमेंट ड्युरींग द मराठा पिरियर, एम.फिल, प्रबंध, पृ. क्र ३१.
15. ग र भिडे, पु.ल. देशपाडे, उपरोक्त पृ . क्र. २४०-२४१.
16. गाढवे ए.एस, उपरोक्त पृ. क्र. ६०-६१.
17. ग र भिडे, पु.ल. देशपाडे, उपरोक्त पृ. क्र. ३८४.
18. भिडे ग.रं, बाबा गजबर, कलामहर्षी बाबुराव पेंटर पृ. ४२.